महाराष्ट्र शासन

# शिक्षण संचालनालय

## माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य

**मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१**

संकेतस्थळ- www.school.maharashtra.gov.in
फोन नं. – 020 26122491
ई-मेल – doesecondary@gmail.com
ई-मेल – doevidya@gmail.com

क्र. शिसं/रासेयो/कार्यशाळा/२०१८/२३६/विद्या शाखा / १८५
दिनांक ०६/०१/२०१८

0 6 JAN 2018

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक
   सर्व विभाग
२. विभागीय समन्वयक,
   राष्ट्रीय सेवा योजना, सर्व विभाग
३. जिल्हा समन्वयक,
   राष्ट्रीय सेवा योजना, सर्व जिल्हे

विषय :- राष्ट्रीय सेवा योजना + २
जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांची
एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करणेबाबत.
**मंगळवार दि. १६/०१/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता**

संदर्भ :- राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तरावरील संचालनालय स्तरावरील सल्लागार समिती बैठक शुक्रवार दि.०४/०७/२०१६ चे इतिवृत्त

संदर्भाधीन विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तरावरील संचालनालय स्तरावरील सल्लागार समिती बैठक दि.०४/०७/२०१६ चे बैठकीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर साठी जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांची एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात यावी असे ठरले होते. त्यानुसार सर्व राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तरावरील, सहाय्यक संचालक, विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक यांची एकदिवसीय कार्यशाळा मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली **मंगळवार दि. १६/०१/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता नेस वाडीया कॉलेज ऑफ कॉमर्स, व्ही. के. जोग पथ, कॅम्प, पुणे-**

**४११००१ येथे** आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेस सर्व राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तरावरील, सहाय्यक संचालक, विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक यांनी उपस्थित राहावे.

सदर बैठकीमध्ये मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे, राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, मुंबई, सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, राष्ट्रीय सेवा योजना, क्षेत्रिय केंद्र, पुणे, समन्वयक (प्रशिक्षण), ट्रेनिंग केंद्र, अहमदनगर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी **सदरील बैठकीसाठी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक संचालक विभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक यांनी उपस्थित रहावे. प्रतिनिधींना पाठविण्यात येऊ नये.**

कार्यशाळेसाठी येतांना सहाय्यक संचालक यांनी आपल्या विभागाची खालील माहिती विहीत प्रपत्रात सोबत आणावी. **(अद्ययावत व परिपूर्ण माहिती विभागाची एकत्रित सादर करावी)**

१) सन २०१७-१८ करीता राष्ट्रीय सेवा योजनेसाठी प्राप्त अनुदानाचे ऑनलाईन वाटपासाठी ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे वाटप केले आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयाचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेचे नांव व शाखा, खाते क्रमांक, IFSC Code No., e mail id. इ. माहिती अनुदानाच्या मागणीसह सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी (MS-EXCEL) फॉरमॅट मध्ये सादर करावी. (सोबत विहीत प्रपत्र जोडले आहे.) सर्व युनिटचे पासबुक झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर स्वयंसेवकांची नोंदणीची आपल्या विभागातील माहिती या संचालनालयास सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रामध्ये सादर करावी. (विहीत प्रपत्र सोबत जोडले आहे). सदर माहिती फक्त सॉफ्ट कॉपी **(MS-EXCEL)** मध्ये पाठविण्यात यावी.

३) राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर युनिटची आपल्या विभागातील माहिती या संचालनालयास सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रामध्ये सादर करावी. (विहीत प्रपत्र सोबत जोडले आहे). सदर माहिती फक्त सॉफ्ट कॉपी **(MS-EXCEL)** मध्ये पाठविण्यात यावी.

४) राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर साठी सन २०१७-१८ मध्ये घेतलेल्या/घेण्यात येणाऱ्या विशेष शिबीरांची माहिती सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रामध्ये सादर करावी. (विहीत प्रपत्र सोबत जोडले आहे). सदर माहिती फक्त सॉफ्ट कॉपी **(MS-EXCEL)** मध्ये पाठविण्यात यावी.

५) ज्या विभागांनी विभागीय शिबीर घेतले असतील त्यांनी विभागीय शिबीराचा खर्च अहवाल मुळ बीलांसह सादर करावा.

६) राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थी स्वयंसेवकांकडून प्रतिविद्यार्थी रु.१०/ प्रमाणे नोंदणी शुल्क ऑनलाईन संचालनालयाचे खात्यात जमा केल्यावर त्याचे स्टेटमेंट/पावती या संचालनालयास सादर करावे.

७) राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत सहभागी होणा-या स्वयंसेवकांना डाय-या, बॅचेस, प्रमाणपत्र व कार्यक्रम अधिकारी बॅचेस् छापून विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयास पूरविण्यात आले आहेत, सदर

साहित्य सुस्थितीत पोहचले किंवा कसे तसेच किती साहित्य आपणास प्राप्त झाले याची माहिती/अहवाल या संचालनालयास सादर करावा.

**राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तरावरील माहिती काही विभागांकडून वेळेत सादर केली जात नाही, अथवा अपूर्ण सादर केली जाते. ही बाब गंभीर आहे. त्यामुळे उपरोक्त नमूद माहीती न चुकता सोबत आणावी, व संचालनालयामार्फत वेळोवेळी मागितलेली माहिती वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी.**

**(गंगाधर म्हमाणे)**
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय,म.रा.,पुणे.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१. प्राचार्य, संबंधित कनिष्ठ महाविद्यालय (विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे मार्फत)

**प्रत माहितीसाठी -**

१) डॉ अतुल हं. साळुंके, राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, एलफिन्सटन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई १.

२) सहाय्यक कार्यक्रम सल्लागार, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय केंद्र, पुणे, १ ला मजला, एन.सी.सी. ऑफिस च्या वर, 'अ' हॉस्टेल ब्लॉक, कृषी महाविद्यालय परिसर, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

३) समन्वयक (प्रशिक्षण) टी.ओ.आर.सी/टी.ओ.सी, अहमदनगर ट्रेनिंग केंद्र, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर.

४) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे स्वीय सहाय्यक.